Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.X/Nov; 11pp.1-4  ISSN:-2230-7850

Research Papers

# मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राचे आचार्य गोखलेकृत प्रस्थापन

प्रा.डॉ. आनंद वसंत डुडूल
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
चिखलदरा.

## *प्रास्तविक*

आचार्य श्री विवेक गोखले हे तत्त्वज्ञानाचे नामवंत प्राध्यापक त्याच बरोबर संगीताचेही जाणकार सौंदर्यशास्त्र ही तत्वज्ञानाची एक शाखा असल्याने व मर्ढेकर हा सातत्याने गोखल्यांचा अभ्यास विषय असल्याने मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रावर त्यांनी लिहावे. हे स्वाभाविकच. मर्ढेकरांची कविता विवाद्य ठरली तसेच त्यांच्या सौंदर्यशास्त्रीय लेखनावरही अनेक अभ्यासकांनी परस्परांशी टोकाचे मतभेद नोंदविले.

श्री.गोखले यांच्या ग्रंथाचे नाव "मर्ढेकर आणि टीकाकार भ्रांत कोणऋ"आहे. अर्थात मर्ढेकर भ्रांत नसल्याचे त्यांनी साधार मत मांडले आहे. मर्ढेकरांचे टीकाकार मात्र भ्रांत असण्याची शक्यताही नोंदविली आहे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील मेरूमणी श्री मेघश्याम पुंडलिक रेगे यांच्यापासून सुरूवात करून रा.भा.पाटणकर प्रभाकर पाध्ये सुरेंद्र बारलिंगे माधव आचवल संभ्आजी कदम द.भि.कुलकर्णी म.गं नातू अशा नामवंत व दिग्गज अभ्यासकांचे मर्ढे करांच्या सौंदर्यशास्त्रीय लेखनाचे आकलन कसे सदोष त्रुटीपूर्ण आहे व त्यामुळे त्यांचे मर्ढेकरांच्या लेखनावरील आक्षेपही कसे अप्रस्तुत व अनाठायी हे गोखल्यांनी चिकित्सकपणे दर्शविले आहे. द.भ. कुलकर्णी यांचा "मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र ः पुन ः स्थापना" हा प्रयत्न प्रामाणिक असला तरी ज्याची पुनर्स्थापना करायची त्याचेच द.भिंना नीट आकलन झाले नाही असे मत ते सखेद नोंदवितात द.भि. कुलकर्णी आणि यशवंत मनोहर यांच्या विषयी ते साडेतोडपणे लिहितात. "दोघांचाही साहित्य आणि समीक्षा क्षेत्रातला लैकिक चांगला पण दोघांच्याही बाबतचा एक वाईट योगायोग असा की दोघांचेही मर्ढेकरांच्या सौंदर्य शास्त्रीय भूमिके संबंधीचे विवेचन गोंधळलेले आणि महत्त्वाच्या बाबतीत चूक आहे. कदाचित तत्त्वज्ञानाची अपुरी ओळख हे त्याचे एक कारम असावे. पण दुसरे कारम असे असावे की विषयाच्या मागणीनुसार सौंदर्यशास्त्रीय ऊहापोह करणे आवश्यक तर होते ह्यपण स्वतःला तर ते स्पष्ट कळलेले नाही की असे त्यांना वाटलेच नाहीॐह तेव्हा जसे जमते ओह ते तसेच रेटावे असा त्यांनी विचार केला असावा. नागपूरच्या विदर्भ साहित्य संघाने डॉ.द.भि. कुलकर्णींना अशाही ग्रंथासाठी आपली 'विद्यावाचस्पती' ही पदवी देऊन गौरवावे हे विद्वजगाचे दुदैवच म्हणायला हवे कारम भरपूर शारीरिक श्रम ज्यासाठी करावे लागणे अटळ असेल असा जाडजूड ग्रंथ लिहिला की तो बौदि्धकदृष्टीनेही दर्जे दार असतो. गैरसमका जनमानसात रूढ होण्यास त्या घटनेने हातभार लागतो."

गोखल्यांच्या मते सौंदर्यशास्त्रीय लेखन करण्यासाठी वा ते नीट समजून घेण्यासाठी मुळात एखाद्याला किमान एक दोन कलांमध्ये गती असली पाहिजे. शिवाय त्याला तात्त्वज्ञानाचेही उत्तम ज्ञान असले पाहिजे. भहुतेक विद्वान या दोन्ही निकषांची पूर्तता करीत नसल्याने त्यांना जाणवते. म्हणूनच ब याच जणांचे या विषयाचे आकलन सदोष आहे. असे ते मानतात.

श्री. गोखले यांची भाषा अत्यंत नेमकी व मुद्देसूद आहे. ईस्थेटिक्स साठी मराठीमध्ये आभिरौचिकी ही संज्ञा रूजविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. श्री. कमलाकर दीक्षित यांनी प्रस्तुत ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावने मध्ये गोखल्यांच्या भाषिक नेमकेपणाबद्दल व मराठी परिभाषा जाणीवपूर्वक रूजविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना प्रशस्ती पत्रक दिलेच आहे.

वास्तवता Being Reality

| | | | | |
|---|---|---|---|---|
| स्थल / काल सापेक्ष | | | स्थल / काल निरपेक्ष | |
| मूल्य - अस्तित्व Existence | | | नैतिकता | आभिरौचिकता |
| गुणधर्म - ऐंद्रिय | मानसिक | बौद्धिक | कर्तव्य, योग्य इ. | सुंदर, रम्य, डौल इ. |
| पांढरा,गोड इ. | सुख- भ्रम इ. | दूर, उंच इ. संबंधात्मक | कृति, संकल्प, हेतु | कलाकृति |
| धारक - वस्तू | मनोवस्था | | | |

*Indian Streams Reserach Journal*
Vol.1,Issue.X/*Nov;* 2011

सौंदर्य हे नैतिकता अस्तित्व यासारखे स्वतंत्र मूल्य असल्याचे प्रस्तुत आकृतीद्वारा स्पष्ट होते . कलावस्तूच्या ठिकाणी सौंदर्य असते . ते तिचे अंग असते . तिच्या ठिकाणी सुप्त रूपात वास करीत असलेले सौंदर्य रसिकाला जाणवते असे म्हणणे व मानणे चुकीचे आहे . गोखल्यांच्या मते कलावस्तू ही सौंदर्याच्या अनुभाव्यतेचे माध्यम असते . व जी कलावस्तू सौंदर्याला अनुभाव्य करू शकते अभिव्यक्त करू शकते तीच कलाकृती या पदवीस पात्र ठरते . तिच्या माध्यमातून अभिव्यक्त होणारे हे सौंदर्य सौंदर्यसंवेदनक्षमता धारण करर्णायाला एखाद्या कलाकृतीमधून सौंदर्य जाणवले याचा अर्थ अशी क्षमता असर्णाया प्रत्येकालाच त्या कलाकृतीमधून सौंदर्य जाणवेल असेही नाही . शिवाय एकाला कमी व दुर्स याला अधिक सौंदर्य जाणवेल असाही नाही . सौंदर्यात तर तम भाव नसतो .

गोखले पुढे लिहितात प्रतिभावंताला कलावस्तू निर्माण करताना तिची सौंदर्य अभिव्यक्त करण्याची किंवा कलाकृती या पदवीस पोहोचण्याची क्षमता जोखता येते . वाड्.मयीन महात्मतेचा मर्ढेकरांचा सिद्धांत येथे महत्त्वाचा ठरतो . या सिद्धांतानुसार कलावस्तूची कलाकृती पदवीस पोहोचण्याची संभाव्यता वाढविता येते . पण हुकुमीपणाने सौंदर्याची अभिव्यक्ती करेलच अशा किंवा कलाकृती या दर्जास पोहोचतील अशा कलावस्तू निर्माण करता येत नाहीत . पुन्हा कलाकृती जे सौंदर्य अभिव्यक्त करते ते तिच्या ठिकाणी सुप्त वा प्रकट रूपात नसते . अस्तित्व या पातळीवरील कलावस्तू सौंदर्य या अस्तित्वाभिन्न मूल्याला धारण करून अभिव्यक्त करू शकते . व त्यावेळीच कलाकृती या नामाभिधानास पात्र ठरते . सौंदर्य हे वास्तवात असतेच (Being reality) त्याची सत्ता असतेच पण त्याचा प्रत्यय येण्यासाठी कलावस्तू या माध्यमाची गरज असते . एखादी कलावस्तू एकाला सौंदर्यानुभव देईल व दुर्स याला कदाचित देणार नाही असे शक्य असल्याने सौंदर्याला अनुभाव्यतेसाठी कलावस्तू व ज्ञातृ सापेक्ष मानले पाहिजे . सौंदर्याची सत्ता मर्ढेकरांनी ज्ञातृनिरपेक्ष व वस्तुनिरपेक्ष मानलेली असल्याने मर्ढेकर गोखल्यांच्या मते वास्तववादी ह्यसौंदर्याच्या सत्तेबाबतह ठरतात .

'अजिंठयाची लोणी सुंदर आहेत' या सौंदर्यविधानाचा अर्थ 'अजिंठयाच्या लेण्याच्या निमित्ताने मला सौंदर्यानुभव आला' असा करणे गोखल्यांना उचित वाटते . प्रत्ययाकरिता वा अनुभाव्यने करिता सौंदर्य ज्ञातृसापेक्ष व वस्तुसापेक्ष असल्याने अनुभवाखेरीज सौंदर्यवाचक विधान शक्य नाही या मर्ढेकरांच्या मताला त्यांनी पुरस्कृत केले आहे . लयासिद्धांन्तावर बरीच चर्चा झालेली असली तरी गोखल्यांच्यामते र्बयाच जणांनी लयसिद्धांन्ताला सौंदर्याची व्याख्या वा निकष मानण्याची चूक केलेली आहे .

साहित्याचे मोल ठरवितामा वा त्याचे श्रेष्ठत्व ठरविताना अनेक समीक्षक साहित्याला जीवन व्यवहारात महत्त्वाचे मानतात . जीवनाची साहित्यातून व्यक्त होणारी व्याप्ती खोली साहित्यिकाचे जीवनाकलन यांना साहित्य समीक्षेमध्ये मोल प्राप्त झाले आहे . थोडक्यात सूक्ष्मपणे व स्थूलपणे जीवनोपयोगिता साहित्याच्या मूल्यमापनामध्ये खूप महत्त्वाची ठरते . मर्ढेकर गोखले यांच्या मते साहित्याची जीवनाभिव्यक्ती हे अ – साहित्यिक मूल्य आहे . ते अपरिहार्य असेलही परंतु साहित्याचे साहित्यत्व अ साहित्यिक मूल्याद्वारा तपासता कामा नये . इतर कलांप्रमाणे संवेदनांचा जिवंतपणा साहित्यात असू शकत नाही . संवेदनासदृश अशा प्रतिमा साहित्यात असतात . शाहित्य अनेक संवेदनागुणांणा आवाहन करते शिवाय साहित्याचे भाषा हे साधन लौकिक सांसरिक वा व्यावहारिक अर्थाने लिप्त असते . त्यामुळे साहित्यापासून जर सौंदर्य मिळवायचे असेल तर साहित्य लयतत्त्वानुसारी असणे गरजेचे आहे असे मर्ढेकरांना अभिप्रेत असल्याने गोखले सांगतात पण त्याचवेळी लयतत्त्वे ही सौंदर्याची व्याख्या वा निकष नाहीत हेही आवर्जून सांगतात . कारम एकतर लय केवळ सावयव वस्तूंबाबत संभवतो आणि नितवयव वस्तू ही सौंदर्याचा अनुभव देऊ शकतात . दुसरे असे की सावयव वस्तू लयपूर्ण असली की ती सौंदर्यानुभव देईलच असे नाही . परंतु सावयव वस्तू जर सौंदर्यानुभव देत असेल तर ती मात्र लयपूर्ण असते . असे गोखल्यांचे काळजीपूर्वक विवेचन आहे .

सेवानिवृत्त झाल्यावरही पूर्ण उत्साहाने ज्ञानोपासना करण्याचा श्री . गोखले सरांचा प्रयत्न अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ऊर्जादायी आहे . दर्यापूर येथील आदर्श ह्यसेवानिवृत्तह शिक्षक व चित्रकार श्री . ना . वा . गोखले यांचे श्री . विवेक गोखले सुपुत्र असल्याने शिक्षकीपेशा त्यांच्यामध्ये चांगलाच मुरला आहे . त्यामुळेच एखाद्या विद्यार्थ्याला व कंटाळता ते तासन्तास विषय समजावून सांगू शकतात . श्री . गोखले यांच्या प्रस्तुत ग्रंथाचे परिपूर्ण मूल्यमापन येथे प्रस्तुत नाही . श्री . मे . पुं . रेगे रा . भा . पाटणकर प्रभाकर पाध्ये माधव आचवल द . भि . कुलकर्णी या सारख्या मान्यवर तत्त्वमीमांसकांचे वा कलामीमांसकांचे विचार श्री . गोखले यांनी कुठे सदोष कुठे त्रुटित तर कुठे अप्रस्तुत ठरविल्याने या क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींनी श्री . गोखलेंच्या विवेचनाकडे आस्थेने व गांभीर्या ने पाहून त्यावर भाष्य करणे अत्यंत गरजेचे आहे . श्री . गोखले यांणा खंडणार्थ करावी लागणारी टीका ही विशुद्ध ज्ञानलालसेपोटीच अवतरलेली आहे . या ग्रंथाचे योग्य रीतीने मूल्यमापन कोणी केले तर श्री . गोखले यांना अर्थात ते फार आनंददायी ठरेल .

अत्यंत असमाधानाची गोष्ट अशी की या अत्यंत महत्त्वाच्या अभ्यासपूर्ण ग्रंथावर म्हणावी तशी चर्चा झालेली नाही . महाराष्ट्रातील बौद्धिका जीवनाबद्दल चिंता वाटावी अशीच ही गोष्ट आहे . श्री . कमलाकर दीक्षित यांची प्रस्तावनाही अत्यंत संक्षिप्त अशीच आहे . नुकतेच मर्ढेकरांचे जन्मशताब्दी वर्ष संपन्न झाले . परंतु त्यांच्या सौंदर्यशास्त्रावर म्हणावी तशी चर्चा झाली नाही . श्री . गोखले यांच्या ग्रंथाची चर्चा व्हावी त्यानिमित्याने मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रीय लेखनाचीही चर्चा व्हावी अशी अर्थातच अपेक्षा आहे .

**संदर्भ** ः

1 . मर्ढेकर आणि टीकाकार भ्रांत कोणत्र आचार्य विवेक गोखले महाराष्ट्र ग्रंथ भांडार कोल्हापूर आवृत्ती **1** ली **3** जून **2006** .